वर्ष : ०६ | अंक: १२ | मुंबई, मंगळवार ११ फेब्रुवारी २०२० ते सोमवार १७ फेब्रुवारी २०२० | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 कोकण रेल्वेत प्रवाशांच्या जीवाशी खेळ

3 → विकासाची खडतर वाट

मुंबईचे वित्तीय राजधानीचे अस्तित्व धोक्यात येणार? ← 4

## हिंगणघाटमधील पीडितेच्या संघर्षाचा शेवट

# शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



**हिंगणघाटमधील पीडितेचा संघर्ष अखेर थांबला असून शोकाकुल वातावरणात तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ आणि इतर लोक उपस्थित होते. अंत्यसंस्काराआधी नातेवाईकांनी लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही अशी भूमिका घेतली होती. अखेर जिल्हाधिकायांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. याआधी मृतदेह स्वीकारण्यासही नकार देण्यात आला होता. मात्र गृहमंत्र्यांनी आश्वासन दिल्यानंतर तो स्वीकारण्यात आला.**

हिंगणघाट जळीतकांडातील पीडितेचा सोमवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. महाविद्यालयात प्राध्यापक असणाऱ्या तरुणीवर आरोपी विकेश नगराळे याने पेट्रोल टाकून पेटवून दिलं होतं. मागील सोमवारी ही घटना घडली होती. गेल्या सात दिवसांपासून पीडितेवर उपचार सुरू होते. डॉक्टरांचं विशेष पथक तरुणीवर उपचार करत होतं. मात्र, सोमवारी अचानक हृदयविकाराच्या धक्क्यानं तिचा मृत्यू झाला.

हिंगणघाटमधील पीडितेच्या मृत्यू झाल्यानंतर गावात तणाव निर्माण झाला होता. संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरुन निषेध व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. संतप्त नागरिकांनी यावेळी मृतदेह घेऊन जाणारी रुग्णवाहिका अडवली होती. तसंच काहीजणांनी दगडफेकही केली. नागरिकांकडून पोलिसांना धक्काबुक्कीही करण्यात आली. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ३०० पोलिसांचा फौजफाटा गावात तैनात होता.

## महाराष्ट्र दयामाया दाखवणार नाही, आरोपीला फासावर लटकवू – उद्धव ठाकरे



हिंगणघाट जळीतकांड प्रकरणातील आरोपीला कोणताही दया माया दाखवली जाणार नाही. आरोपीला लवकरात लवकर शिक्षा होईल, गुन्हा सिद्ध करुन आरोपीला फासावर लटकवू असं आश्वासन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. 'आरोपीला कोणताही दया माया दाखवली जाणार नाही. या सगळ्याचा आम्ही पाठपुरावा करु. अनेकदा अशा प्रकरणांची न्यायालयात बराच वेळ सुनावणी सुरु असते. निकाल लागला तरी शिक्षा होण्यास वेळ लागतो. तसं या बाबतीत घडू देणार नाही. लवकरात लवकर गुन्हा सिद्ध करुन आरोपीला फासावर लटकवू,' असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.




## 'स्वातंत्र्यवीर सावरकर हे अद्भुत क्रांतिकारक, विचारवंत होते': राज्यपाल कोश्यारी



**दोन वेळा जन्मठेप होऊन देखील न डगमगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हे देशातील अद्भुत क्रांतिकारक, द्रष्टे विचारवंत व उत्तुंग प्रतिभा लाभलेले कवी होते. देश पारतंत्र्यात असताना हजारो लोकांनी हाल अपेष्टा सोसल्या, अनेकांनी प्राणांची आहुती दिली. अश्या स्वातंत्र्य सेनानींमध्ये सावरकर यांचे स्थान अनन्यसाधारण असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी येथे काढले.**

'स्वातंत्र्यवीर सावरकर सध्याच्या संदर्भात' या डॉ. अशोक मोडक लिखित पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन राज्यपालांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ७) मुलुंड येथील महाराष्ट्र सेवा संघ येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

सन १८५७ च्या लढ्याची ब्रिटिशांनी 'शिपायांचे बंड' अशी संभावना केली असताना तो लढा इंग्रजांविरुद्ध देशाचा पहिला स्वातंत्र्य लढा होता, असे सावरकरांनी निक्षून सांगितले. सावरकरांसारख्या थोर नेत्यांच्या योगदानामुळेच अनेक झंजावातांना सामोरा जात देश आज ताठ मानेने उभा आहे, असे राज्यपाल म्हणाले. सावरकरांनी जातीभेदाला नेहमी विरोध केल्याचे स्मरण देत जातीभेद दूर करणे ही सावरकरांना खरी आदरांजली ठरेल असे कोश्यारी यांनी सांगितले.

यावेळी लेखक डॉ. अशोक मोडक यांनी पुस्तकामागची भूमिका सांगितले. महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष चन्द्रशेखर कुलकर्णी यांनी संघाच्या कार्याची माहिती दिली, तर कार्यवाह जयप्रकाश बर्वे यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मारक समितीचे कार्यवाह वसंत रानडे, महाराष्ट्र सेवा संघाचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक उपस्थित होते.

# गुजरात एटीएसची मुंबईत मोठी कारवाई!

## १९९३ बॉम्बस्फोटातील आरोपीला पाकिस्तानी पासपोर्टसह अटक

*मुंबई - गुजरातएटीएसने (दहशतवादविरोधी पथक) मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी मुनाफ हलारी मुसाला मुंबई विमानतळावरून अटक केली आहे. ही कारवाई शनिवारी मुसा दुबईला जात असताना करण्यात आली असल्याची माहिती गुजरातएटीएसचे उपअधीक्षक के. के. पटेल यांनी दिली. पाकिस्तानी पासपोर्ट मुसाकडून हस्तगत करण्यात आला आहे. गेल्या वर्षीपासून १५०० कोटींचे ड्रग्स तस्करीप्रकरणी मुसा गुजरात एटीएसच्या रडारवर होता.*



१९९३च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी असलेल्या मुसाला मुंबई विमानतळावरून अटक केली. १५०० कोटींच्या ड्रग्स तस्करी करणाऱ्या रॅकेटप्रकरणी तो गेल्या वर्षीपासून गुजरात एटीएसच्या रडारवर होता. आरोपी मुनाफ मुसा याला काल मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक करण्यात आली. तो पाकिस्तानी पासपोर्टद्वारे प्रवास करत होता. तो दुबईला जाण्यासाठी निघाला असताना ही अटकेची कारवाई करण्यात आली.

१९९३ मुंबई येथे झालेल्या साखळी बॉम्बस्फोटामध्ये मुसा हा आरोपी आहे, या बॉम्बस्फोटात २६० लोकांचा मृत्यू तर आणि ७०० हून अधिक लोकं जखमी झाले होते. या बॉम्बस्फोटानंतर तो देश सोडून पळून गेला आणि दक्षिण आफ्रिकेत लपला होता, असे अधिकाऱ्याने सांगितले. गेल्या वर्षी गुजरातच्या किनाऱ्यावर ९०० कोटी रुपयांचा ड्रग्स तस्करी केल्याप्रकरणी मुसा गुजरात एटीएसच्या रडारवर होता. ड्रग्स प्रकरणात गुजरात एटीएस त्याच्या भूमिकेची चौकशी करीत आहे, अशी एका अधिकाऱ्याने माहिती दिली.

## हिंगणघाट येथील महिला अध्यापिकेच्या निधनाबद्दल राज्यपालांना तीव्र दुःख

हिंगणघाट येथे जळीत प्रकरणात गंभीर जखमी झालेल्या महिला अध्यापिकेच्या निधनाबद्दल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आपल्या शोकसंवेदना कळविल्या आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत असलेल्या हिंगणघाटच्या अध्यापिका असलेल्या मुलीचे नागपूर येथे निधन झाल्याचे समजून अतिशय दुःख झाले. आज संपूर्ण समाज



आक्रोशित आहे. ही दुर्दैवी घटना संपूर्ण समाजाला आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. आज मुली आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहेत. नवनवीन जबाबदाऱ्या व आव्हाने समर्थपणे सांभाळीत आहेत. महिलांचा सर्वंकष उत्कर्ष होण्यासाठी समाजाचा महिलांप्रती दृष्टीकोन अधिक सकारात्मक होणे आवश्यक आहे. या दु:खद प्रसंगी मी मुलीच्या आई-वडिलांना आपल्या तीव्र शोक संवेदना कळवितो, असे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणाऱ्या मुलांनी कापला एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचा केक



**ठाणे :** राज्याचे नगरविकासमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्ताने हृदयाला छिद्र असलेल्या लहान मुलांची मोफत टूडी इको तपासणी करण्यात आली.यांपैकी निदान झालेल्या १०० हुन अधिक बालकांची हृदय शस्त्रक्रिया उद्यापासून ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये पार पाडली जाणार आहे.ज्युपिटर हॉस्पिटलमधील डॉ श्रीनिवास आणि डॉ आशुतोष सिंग या तज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मीरा-भाईंदरवासीयांना भरावा लागणार १ टक्के मेट्रो कर

**भाईंदर - राज्य सरकारने अनेक शहरात मेट्रोचा प्रकल्प मंजूर करुन त्या कामाला सुरुवात केली आहे. यासाठी राज्य सरकारने मीरा-भाईंदरकरांवर १ टक्के अधिक मेट्रो कर आकारला असून तो कर मीरा-भाईंदरकरांना भरावा लागणार आहे.**

मीरा-भाईंदरमध्ये मेट्रोच्या कामाला तीन महिन्यांपूर्वी सुरुवात झाली आहे. त्यामुळे या मेट्रो प्रकल्पासाठी राज्य सरकारने ज्या शहरात हा प्रकल्प होणार आहे, त्या क्षेत्रातील रहिवाशांना मुद्रांक शुल्क अधिकार (स्टॅम्प ड्युटी) मध्ये एक टक्का अधिक जास्त भरावा लागणार आहे. मीरा-भाईंदरबरोबर कल्याण-डोंबिवली महापालिका, भिवंडी-निजामपूर महापालिका या क्षेत्रात हा कर लागू करण्यात आला आहे. या महापालिका क्षेत्रात महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प म्हणून घोषित केलेल्या मेट्रो प्रकल्पासाठी १ टक्के मुद्रांक शुल्क अधिभार वसूल करण्यासाठी कारवाई करण्याचे नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रण कोकण विभाग ठाणे यांना सह नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधीक्षक पुणे विभागाने ३० जानेवारी रोजी पत्राद्वारे कळवले आहे. हा मेट्रो कर जुलै २०१९ पासून भरावा लागणार आहे. मेट्रो प्रकल्पासाठी हजारो करोड रुपये खर्च होणार असल्याने तो खर्च जमा करण्यासाठी या शहरात राज्य सरकारने घर किंवा जमीन विकत घेताना एक टक्का अधिक कर वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

" भविष्यात शहरातील नागरी सुविधेसाठी कर गरजेचा आहे. त्यामुळे हा कर लागू करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील जनतेने हा कर भरावा व सरकारला सहकार्य करावे.
- **प्रताप सरनाईक (आमदार, शिवसेना)**

" मीरा-भाईंदर शहरातील रहिवासी अगोदरच अंडक कर भरत आहेत. त्यांच्यावर कराचा बोजा पडत आहे. त्यामुळे हा निर्णय सरकारने बदलणे गरजेचे आहे.
- **गीता जैन (आमदार, मीरा-भाईंदर)**



" या निर्णयाचे पत्र ३१ जानेवारी रोजी आमच्या विभागाला प्राप्त झाले आहे. निर्णयानुसार ३१ जुलै २०१९ नंतर ज्यांनी घर विकत घेतले आहे, त्या सर्वांकडून हा कर वसूल करण्यात येणार आहे. त्या सर्वांना नोटीसा पाठविण्यात येणार आहे
- **धनंजय लाड ( उपनिबंधक अधिकारी - मीरा-भाईंदर)**

### घर खरेदी गरीबांच्या आवाक्याबाहेर

या मेट्रो कराच्या १ टक्यामुळे घर खरेदी करताना सामान्य नागरिकांवर कराचा बोजा पडणार आहे. महागाईमुळे घर खरेदी करताना गरिबांच्या आवाक्याबाहेर जात आहे. आता ५० लाखांचे घर विकत घ्यायचे असेल तर ५० हजार रुपये जास्त भरावे लागणार आहेत. ज्यांनी निर्णय लागू होण्याअगोदर घर किंवा जमीन विकत घेतलेली आहे. त्यांनाही हा कर भरावा लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. हा निर्णय ज्या तारखेपासून लागू झाला त्या दिवसापासून हा कर वसूल करणे आवश्यक आहे. परंतु तो ३१ जुलै २०१९ पासून हा कर भरावा लागणे म्हणजे हे चुकीचे आहे, अशी प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

# झोपडपट्टीवासीयांना ४०५ चौरस फुटांचे घर देण्याची प्राधिकरणाची तयारी!

महाविकास आघाडी सरकारच्या किमान समान कार्यक्रमात झोपडपट्टीवासीयांना ५०० चौरस फुटांचे घर देण्याची काँग्रेसने केलेली मागणी प्रत्यक्षात येणे शक्य नसल्याचे 'झोपु' प्राधिकरणाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यापुढे याआधीच स्पष्ट केले आहे. प्राधिकरणाने ४०५ चौरस फुटांचे घर देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे या प्रश्नावर हे सरकार कसा मार्ग काढते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

झोपडपट्टीवासीयांना ५०० चौरस फुटांचे घर देऊ, अशी घोषणा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी विधानसभा निवडणुकीत केली होती. आता काँग्रेस सत्तेत सहभागी झाल्यामुळे किमान समान कार्यक्रमात या घोषणेचा प्राधान्याने उल्लेख केला आहे. मात्र झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केलेल्या सादरीकरणात अप्रत्यक्षपणे



झोपडपट्टीवासीयांना ५०० चौरस फुटांचे घर देता येणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. या सादरीकरणाची प्रत आहे.

झोपडपट्टीवासीयांना ५०० चौरस फुटांच्या घराबाबत या सादरीकरणात स्पष्ट करण्यात आले आहे की, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत झोपडपट्टीवासीयांना सध्या ३०० चौरस फुटांचे घर दिले जाते. त्यात ३५ टक्के फंजिबल चटईक्षेत्रफळ देय केल्यास ४०५ चौरस फुटांचे घर देता येईल. मात्र त्यासाठी सध्याच्या नियमानुसार असलेली किमान झोपड्यांची ६५० प्रति हेक्टर ही मर्यादा ५०० झोपड्या प्रति हेक्टर अशी करावी लागेल. योजनेभोवतालचा रस्ता नऊ मीटर रुंद असला तरी उत्तुंग इमारतींना परवानगी द्यावी लागेल. पुनर्विकास योजनेसाठी बंधनकारक मोकळ्या जागेची अट रद्द करावी लागेल. झोपडपट्टी योजनांसाठी विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) अधिक किफायतशीर करावे लागणार आहे. याशिवाय शीघ्रगणकानुसार टीडीआरचा वापर करण्याचा नियम बदलावा लागेल, असे सुचविण्यात आले आहे.

### काँग्रेस भूमिकेवर ठाम..

या प्रकरणात काँग्रेस आपल्या मतावर ठाम असल्यामुळे प्राधिकरणाला त्या दिशेने विचार करावा लागणार आहे. मात्र ते कठीण असल्याची भूमिका प्राधिकरणाकडून मांडली जाण्याची शक्यता आहे. त्यावर मुख्यमंत्री काय निर्णय घेतात, त्यावर या योजेनेचे भवितव्य अवलंबून आहे. धारावी पुनर्विकास योजनेसाठीही अशाच पद्धतीची मागणी शिवसेनेकडून करण्यात आली होती. मात्र प्राधिकरणाने तेव्हाही नकारघंटा दाखविली होती.

आतापर्यंत सर्वच पुनर्विकास योजनांमध्ये फंजिबल चटईक्षेत्रफळ देण्यात येते. मात्र हा नियम झोपडपट्टी योजनांना लागू नव्हता. आता ५०० चौरस फुटांची मागणी पुढे आल्यानंतर प्राधिकरणाने फंजिबल चटईक्षेत्रफळ देण्याची तयारी दर्शविणे म्हणजे 'उपकार' नसल्याची प्रतिक्रिया दिली जात आहे. झोपडवासीयांचा हा हक्कच असून आणखी १०० चौरस फूट देणे शक्य आहे, असा युक्तिवाद केला जात आहे. मात्र यामुळे एकूण चटईक्षेत्रफळात होणाऱ्या भरमसाट वाढीमुळे विद्यमान नियमात बदल करावे लागणार आहेत, असे प्राधिकरणातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# एकोप्यानं राहा, देशातील अन् मराठी मुसलमानांना राज ठाकरेंनी केलंय 'हे' आवाहन

**मुंबई** - पाकिस्तानी व बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध रविवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा (मनसे) मुंबईतील आझाद मैदान येथे मोठा मोर्चा निघाला होता. गिरगाव चौपाटीवरील हिंदू जिमखाना ते आझाद मैदान या मार्गावर या हजारोंच्या उपस्थितीत मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला. या मोर्चात मुस्लीम बांधवही उत्स्फुर्तपणे सहभागी होते. मोर्चानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मोर्चातील उपस्थितांना संबोधित केले. यावेळी, देशातील मुस्लीम हा आमचाच असल्याचंही ठणकावून सांगितलं. तसेच, देशातील मुस्लिमांनाही त्यांनी आवाहन केलंय.



भारतात परदेशातून मुल्ला मौलवी येतात, हे मला पोलीस खात्यातूनच समजलंय. हे जे काही घडतंय ते खूप काही मोठं घडविण्याचं षडयंत्र असल्याचं मला त्यांनी सांगितलंय, असे म्हणत यासंदर्भात केंद्र आणि राज्यातील गृहमंत्र्यांना भेटणार असल्याचे राज यांनी सांगितले. तसेच, एनआरसीबद्दल जे हिंदू, दलित अन् आदिवासी आहेत, त्यांना पुरावे मागू नये, असेही ते म्हणाले. देशभरात ज्यांनी मोर्चे काढले त्यांना हे मोर्चातून दिलेलं उत्तर आहे. तुम्हाला जे स्वातंत्र्य मिळालंय ते जगातील कुठल्याही देशात मिळत नाही. सर्वांनी एकोप्याने राहिलं पाहिजे. जो माझा देशप्रेमी मुसलमान आहे, जो माझा मराठी मुसलमान आहे, त्यांनीही जागृत राहिलं पाहिजे. जे काही चाललंय ते त्यांनीही पुढे येऊन सांगितलं पाहिजे, असे आवाहनही राज यांनी केले आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वात मुंबईत मोर्चा पार पडला. त्यानंतर आझाद मैदानावरील सभेला राज यांनी संबोधित केले. राज्यभरातून हजारो मनसैनिक या मोर्चासाठी आले होते. या मोर्चात मुस्लीम बांधवही उपस्थित होते. मनसेचा हा मोर्चा मुस्लीम बांधवांविरुद्ध नसून पाकिस्तानी आणि बांग्लादेशी घुसकोरांविरोधात असल्याचे या मुस्लीम बांधवांनी सांगितलं. तर, राज ठाकरेंनीही आपल्या भाषणात देशातील आणि महाराष्ट्रातील मुस्लीमांचा हा देश असल्याचं म्हटलं. अनेक मराठी मुसलमान आहेत तिथे दंगली होत नाहीत. पण, जिथे बाहेरून मुस्लीम येत आहेत, तिथेच गैरप्रकार होतात. फक्त बांग्लादेशी मुसलमान नाही तर नायजेरियन घुसखोरांनी वसई-विरार-मिरा-भाईंदर इथे उन्माद घातला आहे, असे राज यांनी म्हटले.

# महाराष्ट्रात भाजपाचं सरकार येत नाही तोपर्यंत 'दिल्लीवारी' नाही-फडणवीस

मी मैदान सोडून पळणाऱ्यातला नाही असं म्हणत माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीला जात असल्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला. जोपर्यंत महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजपाचं सरकार येणार नाही तोपर्यंत मी महाराष्ट्र सोडून कुठेही जाणार नाही असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजपाचं सरकार आल्याशिवाय दिल्लीवारी नाही असंही त्यांनी म्हटलं आहे. मुंबईत झालेल्या कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. आपल्या भाषणात त्यांनी महाविकास आघाडीवरही निशाणा साधला. ठाकरे सरकार हे विश्वासघातकी सरकार आहे ते फार काळ टीकणार नाही असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे. शिवसंग्राम प्रतिष्ठानचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे सरकारवर टीका केली आहे.



आम्ही बदल्याच्या भावनेने कधीही वागलो नाही. मात्र हे सरकार प्रगती नाही तर स्थगिती सरकार आहे अशीही टीका फडणवीस यांनी केली. एवढंच नाही तर शिवस्मारकाचं काम या सरकारने जाणीवपूर्वक थांबवलं असाही आरोप फडणवीस यांनी केला. लोकशाहीची मूल्य या सरकारला मान्य नाहीत असंही त्यांनी म्हटलं आहे. आमच्या कार्यकर्त्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला तर आम्हीही रस्त्यावर उतरवू आणि तुम्हाला तुमची जागा दाखवून देऊ असा इशाराही फडणवीस यांनी दिला. एवढ्या लवकर सत्तेचा माज डोक्यात जाऊ देऊ नका असाही खोचक सल्ला फडणवीस यांनी दिला.

# कोकण रेल्वेत प्रवाशांच्या जीवाशी खेळ

## *बेसिनमधल्या पाण्याची बाटलीबंद विक्री*

**मुंबई : कोकण रेल्वेत प्रवाशांच्या जीवाशी खेळ होत असल्याचा धक्कादायक प्रकार रत्नागिरी स्थानकात पुढे आला आहे. कारण रत्नागिरी रेल्वे पोलिसांनी बेसीनमधील पाणी बाटलीत भरुन ते सील बंद असल्याचं सांगत प्रवाशांना विकले जात होते. हा सारा धक्कादायक प्रकार रेल्वेतील प्रवाशाने पाहिल्यानंतर त्याने याबाबत रेल्वे पोलिसांकडे तक्रार केली. त्यानंतर पाणी विक्री करणाऱ्या रविंद्र व्यास याला पोलिसांनी अटक केली आहे.**

रविंद्र व्यास हा मुळचा गुजरातचा रहिवासी आहे. जामनगर एक्स्प्रेसमध्ये तो पिण्याच्या पाण्याच्या बॉटल विकत होता. त्यावेळ प्रवाशांनी याबाबत तक्रार केली. दरम्यान, रविंद्र व्यासने रेल्वे पोलिसांकडे आपल्या गुन्ह्याची



कबुली दिली आहे. त्यानंतर त्याला आता कोर्टात हजर करण्यात येणार आहे. या साऱ्या प्रकारामुळे जामनगर एक्स्प्रेस जवळपास अर्धा तास रत्नागिरी रेल्वे स्थानकात थांबून होती. सकाळी साडेदहा वाजताचा हा प्रकार आहे.

### प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ

कोकण रेल्वे प्रवाशांच्या आरोग्याशी होत असलेल्या खेळाबाबत हा काही पहिलाच प्रकार नाही. यापूर्वी देखील अशाच प्रकारच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे कोकण रेल्वेने यात लक्ष घालावे अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. झुरळ, उंदीर याचा वावर देखील कोकण रेल्वेतील डब्यांमध्ये वारंवार दिसून येत आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये याबाबत देखील नाराजी व्यक्त केली जात आहे. जामनगर एक्स्प्रेसमधील या साऱ्या प्रकारानंतर कोकण रेल्वे गाड्यातील बाटलीबंद पाणी सुरक्षित आहे का? असा सवाल आता विचारला जात आहे.

### कशी सुचली आयडिया?

रविंद्र व्यास हा रेल्वेत पाणी विकण्याचं काम मागील अनेक दिवसांपासून करत होता. सुरुवातीला बेसिनचं पाणी बाटलीबंद पाणी म्हणून विकल्यानंतर ही बाब कुणाच्याही आली नव्हती. त्यानंतर त्याला देखील याचा मोह आवरला नाही. बेसिनचं पाणी तो १५ रुपये प्रति बाटली विकू लागला. पण, जामनगर एक्स्प्रेसमधील एका चाणाक्ष प्रवासाच्या ही गोष्ट लक्षात येताच त्याने रितसर याबाबत तक्रार केली. त्यानंतर गिरीश व्यासचा 'पाणी'नामा साऱ्यांसमोर आला.

# वीज ग्राहकांना मिळणार दिलासा

आजवर वीज दरवाढीचा शॉक सहन करणाऱ्या राज्यातल्या जनतेला महाविकास आघाडी सरकार लवकरच आनंदाचा धक्का देणारंय. दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रात १०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. तसे संकेत खुद्द उर्जामंत्री नितीन राऊत यांनी दिलेत. महावितरणसह त्यांच्या तिनही वीज कंपन्यांना खर्चात कपात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आजवर वीज दरवाढीचा शॉक सहन करणाऱ्या राज्यातल्या जनतेला महाविकास आघाडी सरकार लवकरच आनंदाचा धक्का देणारंय. दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रात १०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. तसे संकेत खुद्द उर्जामंत्री नितीन राऊत यांनी दिलेत. महावितरणसह त्यांच्या तिनही वीज कंपन्यांना खर्चात कपात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सध्याच्या घडीला महावितरणनं ५९२७ कोटींच्या वीज दरवाढीचा प्रस्ताव



वीज नियामक आयोगाकडे दिलाय. त्यावर लवकरच एमईआरसीमार्फत निर्णय घेतला जाईल. मात्र ही दरवाढ जनतेवर लादली तर सरकारविरोधात नाराजीचा सूर निर्माण होईल. त्यामुळे या दरवाढीपूर्वीच १०० यूनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. आता त्यावर निर्णय होऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते हे पाहणं महत्वाचं ठरेल.

# निवासी भागांत फेरीवाले नको!

## फेरीवाला धोरणातील जागावाटपाला स्थानिकांचा विरोध

**मुंबई : राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पालिकेने मुंबईमध्ये अनेक ठिकाणी फेरीवाल्यांसाठी पदपथांवर आखणी करण्याचा सपाटा लावला आहे. निवासी भागांमध्येही ही आखणी करण्यात येत असल्यामुळे अनेक ठिकाणी रहिवाशी विरुद्ध पालिका असा संघर्ष निर्माण झाला आहे. शुक्रवारी या प्रश्नावरून नगरसेवकांनीही स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाला धारेवर धरले. नैसर्गिक बाजारपेठांमध्येच फेरीवाला क्षेत्रांचे नियोजन करण्याची तरतूद असतानाही पालिका अधिकारी मनमानी कारभार करीत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईमधील विविध विभाग कार्यालयांच्या हद्दीत फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी निवडलेल्या फेरीवाला क्षेत्रांमध्ये पालिका अधिकाऱ्यांनी आखणीचे काम सुरू केले आहे. या ठिकाणी फेरीवाल्यांना एक बाय एक मीटर जागा उपलब्ध करण्यात येणार आहे. अधिकृत फेरीवाल्यांना तेथे बसविण्यात येणार आहे. तसेच काही फेरीवाले आणि स्टॉलधारकांवर स्टॉल हटविण्याच्या नोटीसही बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे फेरीवाले आणि स्टॉलधारकांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

दादरप्रमाणे अनेक निवासी



भागांतील काही रस्त्यांवर आणखी करण्यात आली आहे. यातील अनेक रस्त्यांवर आजतागायत एकही फेरीवाला बसत नाही. आता तेथे फेरीवाल्यांना बसविण्याचा घाट पालिका अधिकाऱ्यांनी घातला आहे, असा आरोप करीत सभागृहनेत्या विखाशा राऊत यांनी स्थायी समितीचे लक्ष या विषयाकडे वेधले. फेरीवाल्यांना निवासी क्षेत्रात बसविण्यात येणार असल्यामुळे रहिवाशी कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. फेरीवाल्यांमुळे रहिवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागण्याची भीती राऊत यांनी व्यक्त केली. नगरसेवकांना विश्वासात न घेताच प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या फेरीवाला क्षेत्रांचा फेरविचार करावा, अशी मागणी त्यांनी केली. तर पालिका सभागृहाची विशेष सभा आयोजित करून या विषयावर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केली.

या प्रकरणावरून रहिवाशी आणि फेरीवाल्यांमध्ये मोठा संघर्ष होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. याची सर्वस्वी जबाबदारी पालिका प्रशासनाची असेल, असे भाजप नगरसेविका राजश्री शिरवाडकर यांनी बजावले. तर शहर फेरीवाला समितीमध्ये नगरसेवकांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. नगरसेवकांना डावलून प्रशासन निर्णय घेत असेल तर ते खपवून घेण्यात येणार नाही, असा इशारा देत स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी फेरीवाला धोरण कसे राबविणार याची माहिती पुढील बैठकीत सादर करण्याचे आदेश पालिका प्रशासनाला दिले.

# नागपाड्यातील आंदोलन मागे घेण्यासाठी महिलांवर दबाव

सीएए, एनआरसी आणि एनपीआर विरोधात नागपाड्यात गेले १३ दिवस सुरू असलेले आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत आहे. आंदोलन मागे घेण्याकरिता महिलांवरील राजकीय दबाव वाढत आहे. मात्र, एनआरसी आणि एनपीआर लागू न करण्याचे लेखी आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची भूमिका आंदोलनकर्त्या महिलांनी घेतली आहे.

हजारोच्या संख्येने स्थानिक महिला आंदोलनात उतरल्या असून गेल्या १३ दिवसांपासून त्यांनी नागपाड्यातील मोरलँड रस्त्यावर ठिय्या दिला आहे. नोकरदार महिला, महाविद्यालयीन तरुणी, ज्येष्ठ नागरिक अशा विविध वयोगटातील महिलांचा यात समावेश आहे. आंदोलनाच्या ठिकाणी कडक सुरक्षाव्यवस्था तैनात आहे. गेले काही दिवस पोलीस आंदोलकांना हटविणार असल्याच्या अफवा पसरत



असल्याने आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने महिला दाखल होत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नसीम सिद्दिकी यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन महिलांनी आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन केले. मात्र आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय येथून हटणार नाही, असा पवित्रा महिलांनी घेतला आहे. मात्र मुंबई बागेतील आंदोलन मागे घ्यावे यासाठी पोलिसांकडून त्यांच्यावर दबाव आणला जात आहे. आंदोलकर्त्यांना पोलिसांनी नोटिसा धाडल्या आहेत. तसेच शुक्रवारी काही कार्यकर्त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची चौकशी करण्यात आली.

# दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीवर कारवाईचा प्रस्ताव

## *५० लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि पाच वर्षापर्यंतची शिक्षा*

त्वचा उजळणे, उंची वाढणे, केसांची वाढ होणे यासह शरीरसंबंधाबाबत दावे करणाऱ्या आक्षेपार्ह जाहिराती केल्यास आता ५० लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि पाच वर्षांपर्यंतची शिक्षा होण्याची शक्यता आहे. औषधे आणि जादूचे उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) या कायद्याअंतर्गत बदल करण्याचे केंद्रीय आरोग्य विभागाने प्रस्तावित केले आहे.



औषधे आणि जादूचे उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) १९५४ च्या कायद्यामध्ये जवळपास ५४ आजार नमूद केले असून यासंबंधी आक्षेपार्ह जाहिरात केल्यास शिक्षा होईल असे नमूद केले आहे. मात्र यात शिक्षेचे स्वरूप दिलेले नाही.

दिवसेंदिवस विविध आजारांवरील औषधांच्या आकर्षक जाहिराती दाखवत फसवणूक करण्याचे किंवा याला बळी पडण्याचे प्रकार घडत आहेत. तेव्हा याला चाप लावण्यासाठी केंद्रीय आरोग्य विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी मसुदा प्रस्तावित केला असून सूचना आणि हरकतींसाठी खुला केला आहे.

आक्षेपार्ह जाहिरात प्रदर्शित केल्या कारणास्तव पहिल्यांदा दोषी आढळल्यास २ वर्षांपर्यंत कारागृहाची शिक्षा तसेच दहा लाख रुपयांचा दंड होईल. वारंवार दोषी आढळल्यास पाच वर्षांपर्यंत कारागृहाची शिक्षा आणि ५० लाख रुपयांपर्यंतचा दंड आकारला जाईल असे या मसुद्यात नमूद केले आहे.

### *कायद्यातील नवीन बदल*

जुन्या कायद्यात नमूद असलेल्या आजारांच्या यादीमध्येही काही बदल केलेले आहे. त्वचा उजळणे, एड्स, केसांचा रंग बदलणे, केसांची वाढ होणे, हत्तीरोग, आनुवंशिक आजार, मेंदूची शक्ती वाढविणे, स्मरणशक्ती वाढविणे, उंची वाढविणे, समागमामध्ये अधिक आनंद मिळवून देणे, मानसिक आजारातून बरे करणे, मूत्रपिंडातील खडे आदींचा नव्याने समावेश केला आहे.

# बस जळून खाक

## दैव बलवत्तर म्हणून ४८ प्रवासी बचावले



धावत्या वाहनांना आग लागण्याच्या गेल्या दिवसांपासून वारंवार घडत आहे. अशीच एक थरारक घटना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर घडली. कणकवलीवरून मुंबईकडे निघालेल्या भरधाव खाजगी बसनं पेट घेतला. या आगीत बस जळून खाक झाली. दैव बलवत्तर म्हणून बसमधील ४८ प्रवासी थोडक्यात बचावले.

साई पूजा या खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीची आराम बस (श्प ०४- इख- ००९) कोकणातील कणकवली येथून ४८ प्रवासी घेऊन मुंबईकडे जात होती. पोलादपूर शहरापासून पुढे काही अंतरावर आल्यानंतर गाडीच्या मागील बाजूने धूर येत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. चालकाने बस थाबवून प्रवाशांना खाली उतरवले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

पृष्ठ १ वरुन

# हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणाऱ्या मुलांनी कापला एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचा केक

या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. या लहान मुलांच्या हस्ते केक कापून नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचा वासाजरा करण्यात आला.

राज्याचे नगरविकासमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाहृदयाला छिद्र असलेल्या लहान मुलांची मोफत डूडी इको तपासणी आज करण्यात आली.यात निदान झालेल्या मुलांवर ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिंदे यांच्या हस्ते आज या शिबीराचे उदघाटन करण्यात आले. त्यापुर्वी या लहान मुलांच्या हस्ते केक कापून नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचा वासाजरा करण्यात आला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ श्रीकांत शिंदे,ज्युपिटर हॉस्पिटलचे सर्वेसर्वा अजय ठक्कर, अंकित ठक्कर, ठाणे जिल्हाधिकारी राधाकृष्ण नार्वेकर,निवासी उपजिल्हाधिकारी शिवाजी पाटील, आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ गौरी राठोड, सिव्हिल सर्जन डॉ. कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ रेंगे सर, रोटरी क्लबचे आंनद माने यांची प्रमुख उपस्थिती होती. तर श्री सिद्धीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष आदेश बांदेकर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

राज्य शासनाच्या महात्मा फुले योजनेअंतर्गत तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत या लहान मुलांची शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. तसेच वानिधीची आवश्यकता असल्यास गरजू रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी,सिद्धिविनायक ट्रस्ट,रोटरी क्लबच्या माध्यमातून अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.

# मुंबईत किमान तापमान १४ अंशांपर्यंत घसरले

मागील दोन दिवसांच्या गारव्यानंतर रविवारी शहरातील किमान तापमानाचा पारा अजून खाली घसरला असल्याने भरदुपारीही हवेत चांगला गारवा जाणवत होता. किमान तापमानातील घट पुढील दोन ते तीन दिवस कायम राहणार असून कमाल तापमानातही घट होण्याचा अंदाज वेधशाळेने व्यक्त केला आहे.

दोन दिवसांपूर्वी मुंबई आणि शहर परिसरात किमान तापमान १८ ते २० अंश सेल्सिअसपर्यंत, तर कमाल तापमान २९.२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. रविवारी किमान तापमानात अजून घट होत १४.४ अंश से.पर्यंत खाली आले. त्यामुळे रविवारची सकाळ गुलाबी थंडी घेऊन आली. बोरिवली ११.०३ आणि पवई येथे १३.५४ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदविण्यात आले. पनवेलमध्ये १०.६० अंश से.पर्यंत खाली गेली असून विक्रमी नोंद झाली आहे.

## संपादकीय...

# विकासाची खडतर वाट


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

जीएसटीअंतर्गत राज्याला मिळणारी भरपाई, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, मराठीचा प्रस्तावित अभिजात दर्जा, दुष्काळी भागांसाठी नदीजोड प्रकल्पांना मंजुरी, राज्यातील प्रस्तावित सिंचन प्रकल्पांना वन खात्याची मंजुरी, नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना केंद्राकडून दिली जाणारी भरपाई, अपुरे सिंचन प्रकल्प, प्रस्तावित सागरी मार्ग, मुंबई, पुणे आणि नागपुरातील 'मेट्रो'चा विस्तार यासारख्या अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांचा महाराष्ट्र सरकारला केंद्र सरकारकडे सतत पाठपुरावा करावा लागतो. आतापर्यंत हा पाठपुरावा प्रशासकीय स्तरावर केला जायचा. महाराष्ट्रात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना संसदेच्या प्रत्येक अधिवेशनापूर्वी प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी काँग्रेसचे मुख्यमंत्री शक्यतो दिल्लीत येऊनच राज्यातील खासदारांशी चर्चा करत असत. आता संसदेच्या अधिवेशनानंतर दिल्लीत आढावा बैठक घेण्याचे सूतोवाच करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ही प्रथा नव्याने रुजविण्याचे संकेत दिले आहेत. शिवाय, खासदारांची समिती बनवून माजी केंद्रीय मंत्री अरविंद सावंत यांना समन्वयक करण्यात आले आहे. याखेरीज, केंद्राकडील प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यासाठी सरकारी यंत्रणा सक्षम व तत्पर बनविण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. महाराष्ट्राचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी एकतर मुख्यमंत्र्यांचे पंतप्रधान व गृहमंत्र्यांशी (शक्यतो व्यक्तिगत) सौहार्दाचे संबंध असावे लागतात तसेच दिल्लीतील नोकरशाहीवर प्रभाव असलेल्या राज्यातील वजनदार नेत्याच्या माध्यमातून प्रश्न मार्गी लावण्याचे पर्यायही हाताशी असावे लागतात. मुख्यमंत्री पंतप्रधानांच्या पसंतीचे असतील तर ताटकळलेले प्रश्न सुटू शकतात, हे पंतप्रधान मोदी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परस्परपूरक सौहार्दातून मार्गी लागलेल्या अनेक प्रकल्पांनी दाखवून दिले. जटील प्रश्नांचा गुंता सोडविण्यात शरद पवार व नितीन गडकरी यांच्या अनुभव तसेच हस्तक्षेपाचाही फायदा झाला. आता राज्यात भाजपविरोधी महाविकास आघाडी सत्तेत आल्यापासून केंद्र आणि राज्य सरकारचे समीकरण बदलले आहे. मुख्यमंत्र्यांना विश्वासात न घेता कोरेगाव-भीमा प्रकरण महाराष्ट्र पोलिसांकडून राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपवताना हे बदललेले समीकरण नकळत अधोरेखित केले गेले. राज्यात फडणवीस सरकार सत्तारूढ होईपर्यंत पंतप्रधान मोदी हे शरद पवार यांना 'गुरू' मानत. राज्यात सत्तांतर होण्यापूर्वी झालेली त्यांची शेवटची अधिकृत भेट ५२ मिनिटे चालली होती. या 'गुरु-शिष्य' संबंधांची सद्यस्थिती त्या दोघांखेरीज तिसऱ्याला ठाऊक नसली तरी ते पूर्वीसारखे निश्चितच उरलेले नाहीत. राज्यात भाजपशी युती असेपर्यंत उद्धव ठाकरेही मोदींचे 'धाकटे भाऊ'च होते. शिवाय, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष असणाऱ्या गृहमंत्री अमित शहा यांच्याशीही ठाकरे यांचा थेट संवाद होता. पण शिवसेनेचा मुख्यमंत्री करण्यासाठी ठाकरे यांना भाजपचा 'दोर' अखेर कापावा लागला. सत्तेसाठी या वैयक्तिक संबंधांमध्ये कटुता आल्याने पवार व ठाकरे यांच्या दिल्ली दरबारातील जुन्या नातेसंबंधांतून महाराष्ट्राचे प्रलंबित प्रस्ताव मार्गी लावताना तूर्त तरी लाभ होण्याची चिन्हे नाहीत. सामान्यपणे लोकसभेचे ४८ आणि राज्यसभेचे १९ असे किमान ६७ खासदार राजधानीत महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतातच. सध्या राष्ट्रपतिनियुक्त डॉ. नरेंद्र जाधव आणि छत्रपती संभाजी तसेच आंध्र प्रदेशाचे प्रतिनिधित्व करीत असलेले सुरेश प्रभू यांच्यामुळे महाराष्ट्राचे ७२ खासदार सध्या संसदेत आहेत. केंद्र सरकारच्या कुठल्याही खात्यात त्यांना थेट प्रवेश असतो. केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी या खासदारांची समिती स्थापन करून तिच्या समन्वयकपदी अरविंद सावंत यांना आणताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सामूहिक शिष्टाईवर भर दिला आहे. त्यामुळे, राज्यात महाविकास आघाडी सरकारचा जन्म सुकर करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळातून कॅबिनेट मंत्रिपद सोडावे लागलेल्या सावंत यांच्या अभ्यासूवृत्तीला आणि सक्रियतेला कुठल्याही मंत्र्याइतकेच 'व्यस्त' राहण्याची संधी मिळाली आहे. आजवर संसदेत महाराष्ट्राच्या खासदारांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे पाठवलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा दिल्लीतील महाराष्ट्र सदनाच्या आयुक्तांच्या अखत्यारीतील समन्वय शाखेतर्फे केला जायचा. आता सर्व खासदारांची समिती आणि त्यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी केलेल्या सावंत यांच्या नियुक्तीमुळे पाठपुराव्यातील संथपणा दूर होऊ शकतो. पण तेवढ्याने प्रलंबित प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. त्यासाठी खुद्द मुख्यमंत्र्यांना दिल्लीवाऱ्या करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. राज्यातील सत्तांतरासाठी कारणीभूत ठरलेले उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना राज्याच्या चौफेर आणि गतिमान विकासासाठी केंद्राची मदत घेताना बदललेल्या राजकीय परिस्थितीत दिल्लीत आपले वजन किती आहे, हे नव्याने आजमावून पाहावे लागेल यात शंकाच नाही.

# कागद हा प्लास्टिकला पर्याय ठरू शकेल?




**देशाच्या स्वातंत्र्य दिन समारंभात १५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेला प्लास्टिकचा वापर थांबवण्याचा सल्ला दिला. आगामी २०२२ सालापर्यंत एकदा वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करण्यास त्यांनी सांगितले. प्लास्टिकची निर्मिती ही फॉसिल फ्युएलपासून होत असल्यामुळे प्रदूषण होण्याचे ते फार मोठे कारण आहे. पण एकदा वापर करून फेकून देण्यात येणारे प्लास्टिक म्हणजे काय, हे अगोदर समजून घ्यायला हवे.**

प्लास्टिकची निर्मिती करण्यासाठी पेट्रोलियम उत्पादनांचा ४ टक्के वापर करण्यात येतो. पंतप्रधानांनी ज्या प्लास्टिकचा वापर थांबवा म्हणून सांगितले त्यात प्लास्टिकची कटलरी, प्लास्टिकच्या बॅगा आणि स्टायरोफोम वस्तूंचा समावेश होतो. वॉशिंग्टन येथील अर्थ पॉलिसी इन्स्टिट्यूटच्या मते, जगभरात एक ट्रिलियन प्लास्टिकच्या बॅग वापरण्यात येतात आणि त्यापैकी ८० लाख टन इतक्या प्लास्टिक बॅग समुद्रात फेकण्यात येतात. २०१७-१८ सालात भारताने दररोज २६,००० टन प्लास्टिकचा कचरा निर्माण केला. त्यापैकी १५,६०० टन प्लास्टिकचा दररोज फेरवापर करण्यात येतो आणि बाकीचे प्लास्टिक फेकण्यात जाते. ते नदीच्या पाण्यातून समुद्राला अर्पण केले जाते. जे प्लास्टिक मातीत मिसळून सडते, त्यातून हानिकारक गॅस निर्माण होत असतो.

हवामानात बदलाची गंभीर समस्या सध्या जगाला भेडसावत आहे. त्यामुळे साऱ्या जगभर ऋतूबदलाचे संकट पाहायला मिळते. प्लास्टिकमुळे ८५ कोटी टन इतका कार्बनडाय ऑक्साईडसारखा गॅस वातावरणात सोडला जातो. २०५० सालापर्यंत हे प्रमाण ५६० कोटी टनापर्यंत वाढणार आहे, तर २१०० सालापर्यंत हे प्रमाण २६०० कोटी टन होण्याची शक्यता आहे. प्लास्टिकचे उत्पादन केले जात असताना न्यूरोटॉक्सिक प्रकारची रसायने बाहेर सोडली जातात. त्यात पीव्हीसीपासून व्हिनिल क्लोराईड, पॉलिस्टायरिनपासून डायोक्सिन आणि बेन्झिन, पॉलिकार्बोनेटपासून फॉर्मडीहाईड ही रसायने प्रमुख आहेत. प्लास्टिकच्या बाटल्या आणि खाद्यपदार्थ ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिकचे कंटेनर यांच्या निर्मितीत तयार होणारे बिस्फेनॉल ए हे रसायन पाण्यात मिसळले जाते. पाण्यातील मासे पाण्यात तरंगणारे प्लास्टिक खात असतात. हेच मासे जेव्हा आपण खातो, तेव्हा आपल्या शरीरात हेच बिस्फेनॉल रसायन प्रवेश करीत असते. तेव्हा या संकटाकडे वेळीच लक्ष दिले नाही तर माणसाचे भवितव्य धोकादायक ठरू शकते.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी केलेल्या वक्तव्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. प्लास्टिकचे विघटन होण्यासाठी साधारणत: एक हजार वर्षे लागतात. पण ज्यांचे विघटन होऊ शकत नाही अशा वस्तू वातावरणात राहतात आणि त्यामुळे प्रदूषणाच्या पातळीत वाढ होते. ते आरोग्यासाठीही घातक असते. अशा स्थितीत प्लास्टिकला कोणता पर्याय मिळू शकतो? जे पर्याय आहेत ते वातावरणपूरक आहेत का? एकदा वापरून

फेकून देता येणाऱ्या प्लास्टिक बॅगसाठी दीर्घ मुदतीचा कशा प्रकारचा तोडगा असू शकतो? वापरा आणि फेकून द्या, यासाठीसुद्धा योग्य पर्याय शोधावा लागेल. भारतात दरडोई प्लास्टिकचा वापर १५ किलो इतका असून, त्यापैकी ६० टक्के प्लास्टिकचे रिसायकलिंग होत असते.

भारतात प्लास्टिकची निर्मिती करणारे ३०,००० उद्योग असून, त्यात ४० लाख लोक काम करीत असतात. प्लास्टिक प्रोसेसिंग करणारा व्यवसाय एकूण २.२५ लाख कोटी रु.चा असून, प्लास्टिकच्या मालाची निर्यात करणारे २००० निर्यातदार आहेत. प्लास्टिकच्या उत्पादनावर बंदी घातली तरी त्याची अंमलबजावणी करणे सोपे नाही. असंघटित क्षेत्रातील कारखाने प्लास्टिकचे लपूनछपून उत्पादन करीतच राहतील. बड्या प्लास्टिकच्या निर्मात्यांनी पर्यावरण रक्षणाचा विचार कधी केला नाही, मग हे असंघटित क्षेत्रातील कारखानदार तरी का करतील?

कागदाच्या वापराचे अनेक फायदे आहेत. त्याचे विघटन दोन ते सहा आठवड्यात होते, हा सर्वात मोठा फायदा आहे. त्याउलट प्लास्टिकच्या विघटनाला ५००हून अधिक वर्षांचा कालावधी लागतो. पण कागदाचे विघटन लवकर होत असल्याने तो पाणी लवकर दूषित करतो. कागदी पिशव्यांचा ४३ वेळा फेरवापर केल्यावर त्यापासून पर्यावरणास लाभ मिळू शकतो. याउलट प्लास्टिकचा एकदाच फेरवापर करणे पर्यावरणस्नेही ठरू शकते. कागदी खोक्यांना प्लास्टिकचे लायनिंग वापरून त्याची उपयुक्तता वाढू शकते. या लायनिंगसाठी मक्याचे कणीस किंवा उसापासून तयार केलेल्या स्टार्चचा उपयोग करणे शक्य आहे. या कागदाचा पुनर्वापरही शक्य आहे.

झाडापासून कागद तयार करण्यासाठी वनसंपदा नष्ट करावी लागते. त्यामुळे प्राण्यांची निवासस्थाने नष्ट होतात. दरवर्षी १ कोटी ३० लाख हेक्टर जमिनीवरील वनसंपदा नष्ट होत असते. पण वृक्षारोपणाच्या माध्यमातून दरवर्षी साधारणपणे ८० लाख हेक्टरमध्ये झाडे उभी होतात. कागदासाठी होणारी जंगलतोड थांबविण्यासाठी समुद्री झुडपांपासून कागदनिर्मिती करायला हवी. तसेच मका, धान्याचे खुंट, उसाची चिपाडे यापासून तयार होणाऱ्या बायोप्लास्टिकचा कागदासाठी उपयोग करायला हवा. सर्व तऱ्हेच्या प्लास्टिकचा पुनर्वापर करता येऊ शकतो. प्लास्टिकच्या बाटल्यांचा उपयोग बगीच्यातील बसण्याची बाके निर्माण करण्यासाठी होऊ शकतो. तेव्हा पर्याय म्हणून बायोपॉलिमरचा वापर करण्याइतकाच प्लास्टिकचा पुनर्वापर करणेदेखील महत्त्वाचे आहे.

# पालेभाज्यांच्या मळ्यांवर पोलिसांनी केली कारवाई

**मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये सर्रास सांडपाण्यावर पालेभाज्या पिकवून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ चालवला जात असल्याचे वृत्त दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली आहे. भाईंदर पोलिसांनी पश्चिमेतील खाजगी जागेवरील सांडपाण्यावरच्या पालेभाज्यांच्या मळ्यांवर शुक्रवारपासून कारवाई सुरू केली आहे.**



रेल्वेरुळांजवळ तसेच भाईंदर पूर्वेच्या नवघर येथील सरकारी जागेत व भाईंदर पश्चिमेस माहेश्वरी भवनकडून मीरा रोडकडे जाणाऱ्या मार्गावर खाडीजवळ तसेच राधास्वामी सत्संगमागील खाजगी जागेत मळे तयार करून पालेभाज्या पिकवल्या जातात. सांडपाण्यावर उघडपणे पालेभाज्या पिकवल्या जातात. या भाज्यांची विक्री सहज केली जात असून अशा भाज्या खाल्ल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला मात्र धोका वाढत आहे. परंतु, या गंभीर बाबीकडे महापालिका प्रशासनासह लोकप्रतिनिधी, अन्न व औषध प्रशासन आदी संबंधितांकडून सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्याने आपल्या अखत्यारित ही बाब येत नसल्याचे सांगितले. पण, पोलिसांनी मात्र या गंभीरप्रकरणी कारवाईसाठी पुढाकार घेतला.

अपर पोलीस अधीक्षक संजयकुमार पाटील यांनी या प्रकरणाची जातीने माहिती घेतली. सांडपाण्यावर पिकवल्या जाणाऱ्या पालेभाज्यांच्या मळ्यांचे ठिकाण मागून घेतले. रेल्वेच्या हद्दीतील सांडपाण्यावरील मळे सोडून पोलिसांनी त्यांच्या हद्दीतील अशा भाज्यांच्या मळ्यांवर कारवाईसाठी पुढाकार घेतला. पाटील यांच्या आदेशानंतर भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी कारवाईची जबाबदारी मुंडे, उथळे, सानप, ठाकूर यांच्या पथकावर सोपवली.

पोलिसांनी त्यांच्या हद्दीतील खाजगी जागेत असलेल्या या सांडपाण्याच्या भाजीमळ्यांवर कारवाईसाठी महापालिकेकडे मनुष्यबळ व जेसीबीची मागणी केली. तीन दिवस पालिकेकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर शुक्रवारी पालिकेने काही कर्मचारी दिले. पोलीस पथकाने त्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शुक्रवारी भाज्या नष्ट करण्यासाठी काठी, खोरे आदींचा वापर केला. तेथून सांडपाणी खेचण्यासाठी लावलेला एक पंप व पाइप जप्त केले. जवळच्या तबेल्यातील गुरांना या मळ्यांमध्ये सोडण्यात आले. परंतु, सांडपाण्यावरील हे भाज्यांचे मळे मोठ्या प्रमाणात असल्याने पोलिसांनी पालिकेकडे जेसीबीची मागणी केली.

### रेल्वेच्या हद्दीतील मळ्यांवर कारवाई केव्हा?

शनिवारी जेसीबी मिळाल्यानंतर त्या जेसीबीच्या मदतीने भाज्या व मळे नष्ट केले. अजूनही काही प्रमाणात मळे शिल्लक असून तेही नष्ट करण्याची कार्यवाही केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सांडपाण्यावर पिकवणाऱ्या पालेभाज्यांच्या मळ्यांवर कारवाई सुरू केली असली, तरी रेल्वेच्या हद्दीतील मळे व नवघर येथील मळ्यांवर अजून कारवाई झालेली नाही.

# कांदा घाऊक बाजारात आता चक्क ५ ते १० रुपये किलो

नवी मुंबई : काही महिन्यांपासून सर्वसामान्यांना रडवणाऱ्या कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सद्यस्थितीत तुर्कस्तानातून आयात केलेला कांदा सडू लागला आहे. त्यामुळे त्याला घाऊक बाजारात ५ ते १० रुपये इतका निचांकी दर मिळत आहे; तर राज्यभरातून बाजार समितीत येणाऱ्या नवीन कांद्याला घाऊक बाजारात २० ते २६ रुपये दर मिळत आहे. मागील आठवड्यात हाच कांदा ३० ते ३५ रुपये दराने विकला जात होता.

या वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले होते. परिणामस्वरूप, बाजारात तुटवडा निर्माण झाल्याने, कांद्याने शंभरी पार करत १२० ते १३० रुपये किलोपर्यत उसळी घेतली होती. मागणीइतका पुरवठा होत नसल्याने केंद्र सरकारने



तुर्कस्तान, इजिप्तमधून मोठ्या प्रमाणात कांदा आयात केला होता. हा कांदा उरणच्या जेएनपीटी बंदरात ठेवण्यात आला होता. हॉटेल व्यावसायिकांकडून या कांद्याला मागणी होती. मात्र आता बाजारात नवीन कांद्याची आवक वाढू लागल्याने, दरात सरासरी २३ रुपयांपर्यंत घसरण झाली आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत बाजारात उन्हाळ दाखल होतो. परिणामी, आवक वाढून कांद्याच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता असल्याचे घाऊक व्यापारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

### आयात कांद्याकडे पाठ

नवीन कांद्याची आवक वाढल्याने आयात कांद्याची मागणी घटली आहे. त्यामुळे जेएनपीटीत सात हजार टन कांदा पडून आहे. तो सडू लागल्याने फेकून द्यावा लागत आहे. हा कांदा आकाराने मोठा असून, बेचव आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांनी त्याच्या खरेदीकडे पाठ फिरवली आहे.

### दररोज १५० गाड्यांची आवक

एपीएमसीच्या कांदा-बटाटा बाजारात सध्या दररोज १५० गाड्यांची आवक होत आहे. राज्यातील कांद्याला प्रति किलो २० ते २६ रुपये भाव मिळत आहे; तर आयात कांद्याची मागणी कमी झाली असून, त्याला ५ ते १० रुपये किलो दर मिळत आहे.

# ठाण्यात तब्बल आठ बोगस डॉक्टरांवर कारवाई

कळवा येथील वाघोबानगर आणि भास्करनगर परिसरातील आठ बोगस डॉक्टरांना ठाणे पोलिसांनी रुग्णांवर औषधोपचार करतानाच पकडले आहे. या डॉक्टरांविरोधात कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून बोगस पदव्या प्रमाणपत्रे जप्त केली आहेत.

आलोक सिंह (३९), रमजित गौतम (४७), गोपाल बिश्वास (४७), रामतेज प्रसाद (५०), सुभाषचंद्र यादव (४७), जयप्रकाश विश्वकर्मा (४०), दीपक विश्वास (४८) आणि सत्यनारायण बिंद (४२) अशी अटक करण्यात आलेल्या बोगस डॉक्टरांची नावे आहेत. या सर्वांनी वाघोबानगर आणि भास्करनगर या भागात आपले दवाखाने थाटले होते.

कळवा परिसरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाल्याची



तक्रार ठाणे पोलिसांकडे करण्यात आली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेऊन ठाणे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी या प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले होते. या आदेशानंतर गुरुवारी रात्री ठाणे मध्यवर्ती गुन्हे शोध पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल होनराव यांच्या पथकाने महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन परिषदेतील पदाधिकाऱ्यांच्या मदतीने वाघोबा नगर आणि भास्कर नगर परिसरातील बोगस डॉक्टरांवर कारवाई केली. या कारवाई दरम्यान पोलिसांनी या डॉक्टरांची पदवी प्रमाणपत्रे तपासली असता, ती बोगस असल्याचे तपासणीत समोर आले.

# खोदकामामुळे अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी

**अंबरनाथ** - अंबरनाथ शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचे रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण सध्या सुरू आहे. मात्र या कामांसाठी सुरू असलेल्या खोदकामामुळे अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार सुरू आहेत. यामुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे. यातही या जलवाहिन्यांची वेळेत दुरुस्ती होत नसल्याने पाणी मोठ्या प्रमाणावर वाया जात आहे. त्यामुळे आसपासचे रहिवासी नाराजी व्यक्त करत असून नागरिकांना पाणीटंचाईचीही समस्या उद्भवत आहे. मात्र याकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दुर्लक्ष करत असल्याचे समोर येत आहे.

अंबरनाथ शहरात औद्योगिक वसाहत असल्याने शहरात अवजड वाहतुकीची ये-जा असते. त्यामुळे शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचे रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू आहे. यामध्ये कल्याण-बदलापूर राज्य मार्ग आणि वडवली ते आनंद नगर औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांचा



समावेश आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्याचे काम सुरू आहे. अंबरनाथ पूर्वेकडील वडवली - शिवाजी नगर ते औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या या रस्त्यात शिवाजीनगर भागात खोदकाम सुरू आहे. या खोदकामात अनेक ठिकाणी जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिन्या फुटत असल्याचे समोर आले आहे. या फुटलेल्या जलवाहिन्यांमधून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या कल्याण-बदलापूर राज्य मार्गच्या कामातही अशाच प्रकारे विविध ठिकाणी जलवाहिन्या फुटत आहेत. या जलवाहिन्या अनेकदा रात्रीच्या वेळी सुरू असलेल्या खोदकामात फुटत असतात. त्यामुळे त्याची माहिती संबंधित जीवन प्राधिकरणाला देण्यासाठी पहाटेपर्यंतची वाट पहावी लागते. त्या काळात लाखो लिटर पाणी वाया जात असते. अनेक ठिकाणी फुटलेल्या वाहिन्या दुरुस्त करण्यासाठी वेळ जातो. तर, अनेक ठिकाणी तात्पुरती डागडुजी करून वेळ मारून नेली जात आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होत आहे. रात्री फुटलेल्या वाहिन्यांबाबत सकाळी लक्षात आल्यानंतर त्यासाठी तक्रार करून त्याची दुरुस्ती होईपर्यंत मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून गेलेले असते. तसेच, वारंवार रस्ते खोदकामात जलवाहिन्या फुटत असल्याने पाणीटंचाईची समस्याही यातून उद्भवत आहे. त्यामुळे रस्त्याच्या या कामांसाठी पाण्याची नासाडी होत आहे. एकीकडे जीवन प्राधिकरण नागरिकांना पाणीबचतीचा संदेश देत आहे. मात्र त्याचवेळी प्राधिकरणाच्या चुकांमुळे वाया जाणाऱ्या पाण्याचे काय, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे. याविरोधात रस्त्याचे काम करणारा कंत्राटदार आणि जीवन प्राधिकरणाच्या बेजबाबदार कारभारावर नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

# अश्लील नृत्य करताना ऑर्केस्ट्रा बारमध्ये सापडल्या तब्बल २४ बारबाला

**मीरारोड** - काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील नाईट लाईफ ( सनसिटी ) या ऑर्केस्ट्रा बारवर पोलीस उपअधीक्षक शशिकांत भोसले आणि पथकाने मंगळवारी रात्री धाड टाकली असता बारमध्ये तब्बल २४ बारबाला अश्लिल नाच करताना आढळून आल्या. पोलीसांनी त्या बारबालांची सुटका करत बारमध्ये अय्याशी करणाऱ्या ग्राहकांसह बारचे कर्मचारी आदी मिळुन ३३ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. तर बारचे चालक - मालकाचा शोध सुरु आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. शिवाजी राठोड व अपर अधीक्षक संजयकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या माहितीनुसार भोसले व त्यांच्या पथकाने मंगळवारी रात्री ११ च्या सुमारास सनसिटी ऑर्केस्ट्रा बारवर धाड टाकली. या धाडीत ऑर्केस्ट्रा बारमध्ये केवळ ४ गायिकांना ठेवण्याची परवानगी असताना तब्बल २४ बारबाला बारचालकाने ठेवल्या होत्या. बारबाला आकर्षक व तोकडे कपडे घालून अश्लिल नाच करत होत्या.

सदर बारमध्ये बारचे चालक - मालक, कर्मचारी व ग्राहकांकडून सदर बारबालांना अश्लिल नृत्य करण्यास संगनमताने प्रोत्साहित केल्याप्रकरणी तसेच ऑर्केस्ट्रा बारमध्ये नाचण्यास प्रतिबंध असल्याने ३४ जणांवर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील अय्याशी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांसह बार कर्मचारी, बाऊंसर आदी ३३ जणांना पोलीसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये गुजरात, चंदिगड, मुंबई आणि मीरा भाईंदरमधील ग्राहकांचा समावेश आहे. या घटनेने शहरातील ऑर्केस्ट्रा बारमध्ये सर्रास बारबालांना नाचवले जात असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# यापुढे दगडाला दगडाने आणि तलवारीला तलवारीने उत्तर देणार – राज ठाकरे



**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोर्चाला मोर्चाने उत्तर दिलं आहे, यापुढे दगडाला दगडाने आणि तलवारीला तलवारीने उत्तर देणार असं सांगत सुधारित नागरिकत्व कायद्याच्या (सीएए) विरोधात मोर्चा काढणाऱ्यांना इशारा दिला आहे. 'आज आम्ही मोर्चाला मोर्चाने उत्तर दिलं आहे. अजून उन्माद घातलात तर दगडाला दगडाने उत्तर आणि तलवारीला तलवारीने उत्तर मिळेल. एकोप्याने राहा, उगीच ताकद दाखवू नका,' असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशातील घुसखोरांना देशाबाहेर काढण्याच्या मागणीसाठी राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसेचा महामोर्चा काढण्यात आला.**

मोर्चा आझाद मैदानात पोहोचल्यानंतर राज ठाकरे यांनी संबोधित करताना घुसखोरांचं संकट गंभीर प्रश्न असल्याचं म्हटलं. 'माझा देश म्हणजे धर्मशाळा आहे का? कुठूनही येतात आणि आपल्या देशात घुसखोरी करतात. बेरोजगारी आणि अन्य महत्त्वाचे मुद्दे आहेत तसंच घुसखोरीवरचं संकट हा महत्त्वाचा प्रश्न आहे,' असं राज ठाकरेंनी यावेळी सांगितलं.

### मुस्लिमांनी काढलेल्या मोर्चाचा अर्थच लागला नाही

'मुस्लिमांनी जे मोर्च काढले त्याचा अर्थच कधी लागला नाही. सीएए किंवा एनआरसी असेल जे जन्मापासून येथे राहत आहेत त्यांना कोण बाहेर काढत होतं. तसं कायद्यातच नाही तर मग तुम्ही कोणाला ताकद दाखवलीत,' असा सवाल राज ठाकरे यांनी मोर्चा काढणाऱ्यांना यावेळी विचारला.

'पाकिस्तानी आणि बांगलादेशी घुसखोरांना हाकललंच पाहिजे. त्यात तडजोड होऊच शकत नाही. अनेकांना सीएएबद्दल काहीच माहिती नाही. फक्त व्हॉट्सअॅपवर चर्चा करतात आणि मेसेज पुढे पाठवतात. हा १९५५ सालचा कायदा आहे. ज्यावेळी देशाची फाळणी झाली त्यानंतर १९५५ साली हा कायदा झाला. तेव्हा परिस्थिती वेगळी होती. आज २००० मधील परिस्थिती वेगळी आहे. पाकिस्तान भारतापासून विभक्त झाला होता, चाचपडत होता. पण आज काय परिस्थिती आहे त्या देशांची आणि खासकरुन पाकिस्तानची,' अशी विचारणा राज ठाकरेंनी यावेळी केली.

### पाकिस्तान दहशतवाद्यांचा अड्डा

'पाकिस्तान दहशतवाद्यांचा अड्डा झालं आहे. अमेरिकेत दहशतवादी हल्ला करणारा ओसामा बिन लादेन पाकिस्तानात होता. आपल्या देशात अनेक बॉम्बस्फोट झाले ज्यात अनेक लोक मारले गेले या सगळ्यामागे पाकिस्तान होतं. दाऊद इब्राहिमलाही पाकिस्तानने सांभाळलं,' असा हल्लाबोल राज ठाकरेंनी केला.

### देश म्हणजे काय धर्मशाळा वाटला का ?

राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी)वरुन टीका करताना राज ठाकरे यांनी देश म्हणजे काय धर्मशाळा वाटला का ? असा सवाल विचारला. 'कोणीही येतं, कसंही राहतं. आपल्या देशात अनेक प्रश्न आहेत याची मला कल्पना आहे. पण बाहेरुन येणाऱ्या घुसखोरांचाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताने काही माणुसकीचा ठेका घेतलेला नाही. बाहेरच्या देशांमध्ये इतके कडक नियम आहे. पासपोर्ट नसल्यास पोलीस दोन पर्या देतातष्ठएक तर तुझ्या देशात परत जा किंवा जेलमध्ये जा. बाकीचे देश सुतासारखे सरळ होत आहेत. पण मग आम्हीच फक्त माणुसकीचा ठेका घेऊन बसलो आहोत का ?,' अशी विचारणा यावेळी राज ठाकरेंनी केली.

# तुमचा पीएफ कापला जातो? मग जाणून घ्या नवे नियम; अन्यथा बसेल फटका!

**नवी दिल्ली –** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आज बजेट सादर केला आहे. बजेटच्या माध्यमातून निर्मला सीतारामण यांनी कराच्या टप्प्यात बदल केलेला आहे. आतापर्यंत जास्त पगार असलेल्या व्यक्तींना भविष्य निर्वाह निधी (EPF), नॅशनल पेन्शन सिस्टम (NPS) च्या योजनांमधून प्राप्तिकरात सूट मिळत होती. पण ती सूट मोठ्या पगारदारांना मिळणं बंद होणार आहे. जर तुमचं वार्षिक गुंतवणुकीतलं योगदान ७.५ लाखांच्या वर आहे आणि आपण भविष्य निर्वाह निधी (EPF), नॅशनल पेन्शन सिस्टम (NPS), Superannuation फंड अंतर्गत गुंतवणूक केलेली असल्यास प्राप्तिकर द्यावा लागणार आहे. तत्पूर्वी अशा योजनांमध्ये गुंतवलेल्या पैशांतून सूट मिळत होती. १ एप्रिल २०२१मध्ये याची अंमलबजावणी होणार असल्याचंही निर्मला सीतारामण यांनी सांगितलं आहे.

समजा आपलं वार्षिक उत्पन्न ३० लाख रुपये आहे. त्या ३० लाखांपैकी पीएफमध्ये ३.६० लाखांचं योगदान दिलं. तसेच NPSमध्ये ३ लाखांचं योगदान, Superannuation फंडात १.५० लाखांचं योगदान, अशी एकूण गुंतवणूक ८.१० लाखांच्या घरात जाते. त्यामुळे या सर्व रकमेवर तुमच्याकडून वार्षिक ६० हजारांचा कर आकारला जाणार आहे. नवे टॅक्स स्लॅब ऐच्छिक असतील, अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. एखाद्या व्यक्तीला या सुविधांचा लाभ घ्यायचा असल्यास त्याला आतापर्यंत मिळणाऱ्या सवलती सोडाव्या लागतील. विम्याचे हप्ते, गुंतवणूक, घर भाडं, मुलांचं शैक्षणिक शुल्क यासारख्या ७० मुद्द्यांच्या आधारे प्राप्तिकरात सवलत मिळते. मात्र नव्या टॅक्स स्लॅबचा फायदा घ्यायचा असल्यास त्यांना या सवलतीवर पाणी सोडावं लागेल. याआधी प्राप्तिकर भरताना या सगळ्या गोष्टींची माहिती दिल्यावर करात सवलत मिळत होती. एखाद्या व्यक्तीचं उत्पन्न ७.५ लाख रुपये असल्यास त्याला सध्या ५० हजार रुपयांचा कर भरावा लागतो. मात्र नव्या टॅक्स स्लॅबनुसार त्याला केवळ २५ हजार रुपयेच कर भरावा लागेल.

सध्याच्या नियमांनुसार संबंधित व्यक्ती विम्याचे हप्ते, गुंतवणूक, घर भाडं, मुलांचं शैक्षणिक शुल्क यासारख्या ७० मुद्द्यांची माहिती देत असल्यास त्याला सवलत मिळते. ही सवलत घेऊन भराव्या लागणाऱ्या कराची रक्कम २५ हजारांपेक्षा खाली येत असल्यास जुनाच टॅक्स स्लॅब फायदेशीर ठरू शकतो. मात्र सर्व कागदपत्रांची पूर्तता करुनही संबंधित व्यक्तीला २५ हजारांपेक्षा जास्त कर भरावा लागत असल्यास त्याच्यासाठी नवा टॅक्स स्लॅब जास्त फायदेशीर ठरेल. नव्या टॅक्स स्लॅबनुसार कर भरताना त्याला कागदपत्रांची पूर्ततादेखील करावी लागणार नाही.

# मुंबईचे वित्तीय राजधानीचे अस्तित्व धोक्यात येणार ?

**मुंबई- इंग्रजांच्या काळापासून मुंबई ही केवळ राज्याचीच नव्हे, तर देशाचीही आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. परंतु गेल्या काही वर्षापासून गुजरातमध्ये गिफ्ट सिटी उभारण्यात येत असून या अर्थसंकल्पात गिफ्ट सिटीसाठी अनेक योजना सादर केल्याने मुंबईचे वित्तीय राजधानीचे अस्तित्व धोक्यात येत असल्याची शंका अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली असून या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला मोठा शून्य आल्याची प्रतिक्रियाही दिली. काही थातूरमातूर लाभ होणार असले तरी केंद्राने राज्याकडे, विशेषतः मुंबईकडे दुर्लक्ष केल्याचेही या तज्ज्ञांचे म्हणणे आहे.**



अर्थतज्ज्ञ अजय वाळिंबे यांनी दिव्य मराठीशी अर्थसंकल्पाबाबत बोलताना सांगितले, राज्याला या अर्थसंकल्पात काय मिळाले हा खराच फार मोठा प्रश्न आहे. तसे पाहिले तर राज्याच्या वाट्याला प्रत्येक वेळेला फार कमी सुविधा दिल्या जातात. अर्थात, संपूर्ण देशाचा अर्थसंकल्पात विचार केला जात असला तरी महाराष्ट्रातून सगळ्यात जास्त कर केंद्राला दिला जात असताना महाराष्ट्रात भरीव तरतुदीची अपेक्षा व्यक्त केली जाते. परंतु या अर्थसंकल्पात राज्याच्या वाट्याला भला मोठा शून्य आलेला आहे, असे मला वाटते. राज्यात अनेक पुरातत्त्व स्थळे असताना हरियाणा, उत्तर प्रदेश, आसाम, गुजरात आणि तामिळनाडू राज्यांतील पुरातत्त्व स्थळांचा विकास केला जाणार आहे. मुंबईकरांचा लोकलचा प्रवास अत्यंत जीवघेणा झाला आहे. यासाठी काहीतरी ठोस, भरीव उपाययोजना होण्याची अपेक्षा होती, परंतु तीसुद्धा फोल ठरली आहे. एकूणच अर्थसंकल्पाकडे पाहिले तर आपल्या राज्याच्या वाट्याला काही म्हणजे काहीही मिळालेले नाही. 'फालतू अर्थसंकल्प' असे मी या एका शब्दात या अर्थसंकल्पाचे वर्णन करीन. केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी कोणत्या राज्याला काय दिले याची माहिती दिलेली नाही. मात्र एकूणच अर्थसंकल्प पाहता महाराष्ट्राला काही मिळाले आहे असे वाटत नाही, अशी प्रतिक्रिया प्रख्यात अर्थतज्ज्ञ दीपक घैसास यांनी दिली. ते म्हणाले, राज्यात शेतकऱ्यांची समस्या फार मोठी आहे. अर्थमंत्र्यांनी देशातील शेतकऱ्यांसाठी १६ सूत्री कार्यक्रम जाहीर केला आहे. यात सेंद्रिय खतांवर भर, सौरपंप, शेतीवर गुंतवणूक, एक वस्तू- एक जिल्हा, जैविक शेती, झीरो बजेट या मुद्द्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. १०० जिल्ह्यांत पाण्याची व्यवस्था करून शेतकऱ्यांना पंप सोलार दिले जाणार. यात २० लाख शेतकऱ्यांना जोडणार. तसेच याशिवाय १५ लाख शेतकऱ्यांना ग्रीड पंप देण्यावर भर असणार. देशात वेअर हाऊस, कोल्ड हाऊस स्टोअरेजला नाबार्डअंतर्गत घेण्यात येणार आहे. यापैकी आपल्या राज्याला काय मिळते ते पाहावे लागेल. यापैकी ज्या योजना लागू केल्या जातील त्याचा आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो.

# मुंबई-दिल्ली एक्स्प्रेस-वे तीन वर्षामध्ये होणार सुरू



**मुंबई –** देशातील पायाभूत सोयीसुविधांना प्राधान्य दिले जाणार असून, याअंतर्गत येत्या पाच वर्षांत १०० लाख कोटींची गुंतवणूक करण्यात येत असल्याचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. यामध्ये नऊ हजार किलोमीटर लांबीचा इकोनॉमी कॉरीडोअर, दोन हजार किलोमीटर लांबीचे सागरी किनारी रस्ते, दोन हजार किलोमीटर लांबीचे महत्त्वाचे महामार्ग आणि २५०० किलोमीटर लांबीचे अॅक्सेस कंट्रोल हायवेजचा समावेश आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जोडण्यासाठीचा दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस-वे २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. वाहतूक क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी १.७० लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ३१ डिसेंबर २०१९ रोजी १०३ लाख कोटींच्या राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइनचा शुभारंभ करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण ६ हजार ५०० प्रकल्प हाती घेण्यात येणार असल्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सीतारामन यांनी जाहीर केले. यास पाठबळ म्हणून २२ हजार कोटी पुरविल्याचे त्यांनी नमूद केले.

रस्त्यांचे जाळे म्हणजे देशभरात नऊ हजार किमीचा इकोनॉमी कॉरीडोअर तयार करणार असल्याचे सांगत दोन हजार किलोमीटरच्या धोरणात्मक महामार्गावरही अर्थमंत्र्यांनी जोर दिला. मुंबई-दिल्ली एक्स्प्रेस-वे पूर्ण करण्याबरोबरच चेन्नई-बंगळुरू एक्स्प्रेस-वेचे कामदेखील पूर्ण करण्यात येत असल्याचे सीतारामन म्हणाल्या.

# आपल्या घरात असा नराधम निर्माण होऊ न देणे हीच खरी श्रद्धांजली – अजित पवार



हिंगणघाटमधील पीडितेचा मृत्यू झाल्यानंतर राजकीय नेत्यांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सगळेच संताप व्यक्त करत आहेत. सोमवारी सकाळी पीडितेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राष्ट्रवादी काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही पीडितेच्या मृत्यूनंतर संताप व्यक्त करत आपल्या घरात असा नराधम निर्माण होऊ न देणे हीच खरी पीडितेला श्रद्धांजली असल्याचं म्हटलं आहे. 'हिंगणघाटमधल्या बहिणीला नराधमाच्या हल्ल्यापासून आणि नंतर मृत्यूपासून आपण वाचवू शकलो नाही, ही महाराष्ट्राच्या मातीसाठी लाजीरवाणी घटना आहे,' असंही ते म्हणाले आहेत.

हिंगणघाट जळीतकांडातील पीडितेचा सोमवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. महाविद्यालयात प्राध्यापक असणाऱ्या तरुणीवर आरोपी विकेश नगराळे याने पेट्रोल टाकून पेटवून दिलं होतं. मागील सोमवारी ही घटना घडली होती. गेल्या सात दिवसांपासून पीडितेवर उपचार सुरू होते. डॉक्टरांचं विशेष पथक तरुणीवर उपचार करत होतं. मात्र, सोमवारी अचानक हृदयविकाराच्या धक्क्यानं तिचा मृत्यू झाला.

अजित पवारांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे की, 'आरोपीला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा लवकरच मिळेल. पण आपल्या घरात असा नराधम निर्माण होऊ न देणे हीच हिंगणघाट हल्ल्यातील मृत बहिणीला आपली आदरांजली असेल'. पुढे त्यांनी म्हटलं आहे की, 'अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ न देण्यासाठी सरकार यापुढे अधिक संवेदनशील व गुन्हेगारांच्या विरोधात कठोरपणे काम करेल. समाजानेही महिलांच्या सन्मानाप्रती जागरूक राहिलं पाहिजे.'

# डॉ. मनीषा शिंदे यांना पीएच. डी. प्रदान



नाशिक - शहरातील धन्वंतरी मेडीकल कॉलेजच्या प्रा. डॉ. मनीषा शिंदे (काळे) यांना होमिओपॅथी संशोधनाबद्दल पीएच. डी. पदवी आरोग्य विद्यापीठात नुकत्याच झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आली. होमिओपॅथीत पीएच. डी. मिळवणाऱ्या त्या राज्यातल्या पहिल्या डॉक्टर ठरल्या आहेत. या यशाबद्दल त्यांचे संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सरोजताई धुमणे-पाटील, सचिव जयंत धुमणे-पाटील, संचालक, सल्लागार मंडळ व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आधार क्रमांक असल्यास आता त्वरीत मिळणार पॅन कार्ड; फॉर्म भरण्याची गरज नाही

जर तुमच्याजवळ आधार क्रमांक असेल तर बँकिंग व्यवहारांसाठी महत्वाचे असणारे पॅन कार्ड आता तुम्हाला त्वरीत मिळू शकणार आहे. यासाठी वेगळा अर्ज करण्याची गरज पडणार नाही. याबाबत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी अर्थसंकल्पादरम्यान घोषणा केली.




सीतारामन म्हणाल्या, करदात्यांच्या आधार क्रमांकावर आधारित व्हेरिफिकेशनची सुरुवात केली जाणार आहे. त्यासाठी करदात्यांच्या सुविधेसाठी लवकरच एक नवी यंत्रणा निर्माण केली जाईल. याद्वारे आधारच्या सहाय्याने ऑनलाईन पॅन कार्डची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्यासाठी कुठलाही अर्ज करण्याची गरज नाही.

प्राप्तिकर कायद्यानुसार, कोणत्याही व्यक्तीला इन्कम टॅक्स रिटर्न भरताना आपल्या आधार क्रमांकाचा उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यासाठी ३१ मार्च २०२० पर्यंत पॅन आणि आधार क्रमांक लिंक करणे बंधनकारक आहे. प्राप्तिकर विभागाकडून एनएसडीएल आणि युटीआय-आयटीएसएल या दोन एजन्सीजच्या माध्यमातून पॅन कार्ड वितरित केले जातात. इन्कम टॅक्स फाईलिंगशिवाय बँक अकाऊंट उघडणे आणि आर्थिक देवाण-घेवाण करण्यासाठी पॅन कार्ड गरजेचे आहे.

## फेसबुकनेच केली तक्रार

# लहान मुलांचे अश्लिल व्हिडीओ अपलोड करणाऱ्या मुंबईतील १७ जणांवर गुन्हे

फेसबुकवर लहान मुलांचे अश्लिल फोटो आणि व्हिडीओ अपलोड केले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी खुद्द फेसबुकनेच तक्रार केल्यानंतर पोलिसांनी तातडीनं गुन्हे दाखल केले आहेत. वसई-विरार परिसरातून चालवण्यात येणाऱ्या १७ फेसबुक खात्यांवर नालासोपारा पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




सोशल माध्यमांपैकी भारतात फेसबुक आणि व्हॉटसअप यांचा प्रभाव जास्त आहे. फेसबुकचे कोट्यावधी वापरकर्ते आहेत. अनेक समाजपयोगी कामांसाठी फेसबुकचा वापर होतो. मात्र, याच फेसबुकवरून चुकीचंही घडतं असल्याचं समोर आलं आहे. लहान बालकांचे अश्लिल साहित्य (चाईल्ड पोर्नोग्राफी) प्रसारीत केले जाऊ लागल्याचं उघडकीस आलं आहे. भारतातून सर्वाधिक चाईल्ड पोर्नोग्राफी ही फेसबुकच्या माध्यमातून केली जात असल्याचे फेसबुकनेच जाहीर केले आहे.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
महा / २०७०/ १५ ठाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० द्वारा नोंदणी

पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)